MHGA130001432023

सत्र खटला क्र. ५७/२०२३
महा.शासन वि. सुरेंद्र पुंडलिकराव गडलिंग

निशानी २१७ वरील आदेश
(दि. २१/०९/२०२४)

१. अर्जदार/आरोपी सुरेंद्र पुंडलिकराव गडलिंग याने सदरचा अर्ज त्यांना कारागुहात वैद्यकीय कारणास्तव योगा मॅट मिळणेबाबत अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह,तळोजा, नवी मुंबई यांना निर्देश देण्याकरीता न्यायालयात दाखल केला आहे.

२. अर्जदार याने असे कथन केले आहे की, तो अंडर ट्रायल कैदी असुन तो कारागुहात ०६ वर्षापासुन आहे. त्यास सदर प्रकरणात आरोपी म्हणुन कलम १३,१८,२०,२३ यु. ए. पी. ए. आणि कलम ३०७, ३४१, ३४२, ४३५, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७,१४८,१२० ब भांदवि मध्ये अटक करण्यात आली आहे. त्याचे वय ५७ वर्ष असून तो गेल्या २० वर्षापासून आजाराने ग्रस्त आहे. त्याला घुटण्याचे दुखने, खांद्याचे दुखने असून त्यास रक्तदाब, मधुमेह, कारडाईक चे आजार आहेत. त्याने दि ९.६.२०१८ रोजी क्ष किरणाने रक्तवाहीची तपासणी सॅसॉन रुग्णालयात केलेली होती. दिर्घकाळापासुन तो कारागृहात असल्याने तो गुडग्याचे दु:खने, सांधे दु:खणे, मानेचा त्रास इ. आजारापासुन ग्रस्त झालेला आहे. व्यायाम, योगा करुन त्याचे प्रकृतीमध्ये सुधार होण्याची शक्यता आहे. दि. २५.१२.२०२३ ते दि २.१.२०२४ या ९ दिवसाकरीता तात्पुरत्या जामीनावर सदर मा. न्यायालयाने सोडले होते. या कालावधी मध्ये त्यांनी योग्य स्वत:करीता औषधोपचार केला होता. तसेच सन २०१५ मध्ये ते डॉ. भंडारवार,नागपूर यांचेकडून आर्युवेदीक औषध घेत आहेत आणि त्यांनी चांगली प्रकृती राहण्याकरीता योगा करण्याचे त्याला सुचविले आहे. त्यामुळे ते नियमीतपणे कारागृहात योगा करीत आहे. परंतु कारागृहात त्यास योगा करणे कठीण जात आहे. करीता त्याने योगा मॅट मिळणेकरीता संबंधीताना निर्देश मा. न्यायालयाने देण्याकरीता विनंती केली आहे.

३.  दि ३.७.२०२४ रोजी सरकारी वकीलांनी आपले म्हणने नि.२१७ च्या पाठीमागे नमुद केले की,त्यांनी सदर अर्जास विरोध दर्शवून कथन केले की, आरोपीने योगा करण्याकरीता योगा मॅट ची मागणी केली आहे परंतू योगा हा योगा मॅट शिवाय करता येतो. त्याकरीता योगा मॅटची गरज नाही. त्यामुळे नमुद बंद्यास कारागृहात योगा मॅट आणण्याची परवानगी देण्यात येवू नये, अशी मा. न्यायालयास विनंती केली आहे.

४.  दि १९.९.२०२४ रोजी अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह,तळोजा, नवी मुंबई यांनी सदर अर्जास आपले म्हणने नि २२१ नुसार सादर केले की, मा. शहर सत्र न्यायालयाने, कोर्ट नं. २५,मुंबई यांना केलेल्या विनंतीवरुन आरोपीस परवानगी आदेशानुसार बॅरेकमध्ये टेबल व खुर्ची वापरण्यास दिलेली आहे. त्यानंतर मा.न्यायालयाचे आदेशानुसार वेस्टर्न कमोडची सुविधा असलेल्या बॅरेकमध्ये बंदीला ठेवलेले आहे. परंतु त्यांनी जागेअभावी आरोपीच्या बॅरेकमध्ये इतर बंद्याची गैरसोय हाउ नये यासाठी त्याला कॉटची सुविधा देण्यात आली नाही.

५.  आरोपीने कारागुहाचे उपहार गृहातून बेडींग खरेदी केल्यास तो सदर बेंडींगचा वापर बॅरेकमध्ये झोपण्यासाठी व योगासाठी निश्चितच करु शकतो. योगामॅट ही जाड रबरी असून त्यामध्ये बंदी अथवा बॅरेकमधील इतर बंदी धारदार तिष्ण वस्तू जसे ब्लेड, पत्रेचे तुकडे इ. लपविण्यासाठी सोयीचे होउ शकते जे प्रशासनास घातक होउ शकते. बंदी सध्या सर्वसाधारण बॅरेकमध्ये बंदीकरीता असल्याने वैयक्तीक सोयीच्या वस्तु उपलब्ध करुन दिल्यास इतर बंद्यांमध्ये असमानतेची भावना निर्माण होउन बंद्यामध्ये वाद होउ शकतो. त्यामुळे नमुद बंद्यास कारागृहात योगा मॅट आणण्याची परवानगी देण्यात येवू नये, अशी मा. न्यायालयास विनंती केली आहे.

६.  दि १९.९.२०२४ रोजी आरोपी श्री गडलिंग व ॲड श्री कुंभारे सरकारी वकील यांचे म्हणने ऐकून घेतले. अभिलेखाची पडताळी केली असता असे दिसून येते की, आरोपी गडलिंग यांचे विरुध्द विश्रामबाग पो. स्टेशन पुणे यांनी गुन्हा क्र ४/२०१८ अंतर्गत अटक करण्यात आले तर एटापल्ली पोलिस यांनी श्री गउलिंग यांना गुन्हा क्र ३५/२०१६ मध्ये अटक केली आहे. या न्यायालयाचे अंतर्गत येणारे नक्षल गुन्हयासंबंधीचे आरोपी हे नागपुर कारागृहात ठेवण्यात येतात. परंतु आरोपी यास शहर सत्र न्यायालय कोर्ट क्र २५

मुंबई यांचेकडे सुरु  असलेल्या प्रकरणामुळे आरोपीला तळोजा कारागृहात ठेवण्यात आलेले आहे.

७.	यापुर्वी आरोपीने टेबल खुर्चीची मागणी मुंबई न्यायालयाला केली त्याप्रमाणे ती मंजुर करण्यात आली. त्यानंतर आरोपीने वेर्स्टन कमोड व कॉटची मागणी केली त्यापैकी कॉटची मागणी पुर्ण करण्यात आली नाही.  अशा परिस्थीतीत जर आरोपीला योगा मॅटची आवश्यकता आहे व त्याकरीता वैद्यकीय अधिका—याने सल्ला दिला असेल तर तशा प्रसंगी आरोपीला शहर सत्र न्यायालय कोर्ट क्र २५ मुंबई यांच्याकडे अर्ज करणे गरजेचे होते. तळोजा कारागृहात कोणत्या कारणामुळे योगा मॅट दिले जाउ शकते अथवा नाही याची प्रत्यक्ष पाहणी कारागृहाला भेट देणारे न्यायीक अधिकारी सुध्दा करु शकतात. दर महिन्याला कारागृहात भेट देण्याकरीता न्यायीक अधिकारी येत असतात तेव्हा सुध्दा त्याबदद्लची मागणी त्यांचेकडे करता येईल. परंतु या न्यायालयाला तळोजा कारागृहात आरोपीला मागणी केल्याप्रमाणे मॅटची आवश्यकता आहे अथवा नाही हे ठरवीता येणार नाही. कारण सरकारी वकीलांचे असे कथन आहे की, योगा करण्याकरीता मॅटची आवश्यकता नाही तशा प्रसंगी आरोपीला बिना मॅटशिवाय योगा करता येईल त्यामुळे अर्जदाराच्या अर्जात  काही तथ्य नाही असा जो युक्तीवाद सरकारी वकीलांनी मांडला तो सदविवेकबुध्दीला पटण्याजोगा आहे.

८.	अर्जदार याचा मुख्य रोष असा दिसतो की, त्याला प्रत्यक्षात सुनावाणी करीता अहेरी न्यायालयात हजर करावे. ते स्वत: वकील असल्यामुळे त्यांना प्रत्यक्षात युक्तीवाद करावयाचा आहे. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता दि १२.१२.२०२३ रोजी आरोपी गडलिंग यांनी नि.१९९ प्रमाणे वकील पत्र सादर करुन ॲड सुमित एस गडलिंग व ॲड. जगदीश मेश्राम यांची नियुक्ती केलेली आहे. न्यायालयात उपलब्ध असलेल्या व्हि सी वरुन त्यांना युक्तीवाद करण्याकरीता सांगण्यात सुध्दा आलेले आहे इतकेच नव्हेतर सदर अर्ज नि २१७ चा अर्ज आरोपीने ३.७.२०२४ रोजी केला परंतू त्यावर कारागृह प्रशासनाचे म्हणने प्राप्त न झाल्यामुळे सदरचा अर्ज उशीरा निकाली काढण्याचा रोष सुध्दा आरोपीने युक्तीवादा दरम्यान व्यक्त केला परंतू वस्तुस्थिती अशी आहे की, कारागृह प्रशासनाने १९.९.२०२४ रोजी नि २२१ प्रमाणे म्हणने दाखल केले आणि त्या दिवशी आरोपी व सरकारी वकीलांची युक्तीवाद ऐकून आज अर्ज निकालाकरीता ठेवण्यात आले.

९.    अर्जदाराला सदरचा अर्जात केलेली मागणी शहर सत्र न्यायालय कोर्ट क्र २५ मुंबई कडे करता आली असती कारण यापुर्वी आरोपी/अर्जदाराने  टेबल, खुर्ची, वेस्टर्न कमोडची मागणी केलेली होती व ती मंजूर सुध्दा करण्यात आली होती. करीता अर्जदाराचा सदरचा अर्ज नस्ती करण्यात येउन अर्जदाराला सदरच्या अर्जात केलेल्या मागणीप्रमाणे अर्ज शहर सत्र न्यायालय कोर्ट क्र २५ मुंबई कडे करण्याची मुभा राहील. करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अर्ज नि.क्र.२१७ नस्ती करण्यात येते.

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.09.21 17:14:44 +0530

अहेरी.    (र. ना. बावनकर)
दि. २१/०९/२०२४    अतिरिक्त सत्र न्यायाधीश अहेरी.